जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUN 2018
पुढारी

# प्रवेश प्रक्रिया वेळापत्रक सोमवारी जाहीर

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठातील एम.ए. (भाषा व सामाजिकशास्त्रे) एम.कॉम., एल.एल.एम., एम.एस्सी., टेक. (गणित) या अभ्यासक्रमांच्या भाग १ प्रवेशासाठी गुणवत्ता यादी व सुधारित वेळापत्रक २ जुलै रोजी संकेतस्थळावर जाहीर करण्यात येणार आहे. यानुसार सोमवारी (दि. २) गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. तर ६ जुलैपासून १० जुलैपर्यंत प्रवेश फेऱ्यांना प्रारंभ होणार आहे. याबाबतची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर यांनी दिली आहे.

30 JUN 2018
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सुवर्णमहोत्सवाकडे वाटचाल करत असलेल्या श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने राज्यात गुणवत्तापूर्ण शिक्षणात स्वतःचा असा ब्रँड निर्माण केला आहे. संस्थेची राज्यात ४०६ शैक्षणिक केंद्रे आहेत. याद्वारे अत्याधुनिक पद्धतीने सुजाण नागरिक घडवण्याचे कार्य संस्था करत आहे. संस्थेचे संस्थापक शिक्षणमहर्षी प.पू.







## शिक्षण क्षेत्रातील ब्रँड

# स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था

डॉ. बापूजी साळुंखे यांचे २०१८–१९ हे जन्मशताब्दी वर्ष आहे. या वर्षात व्यवसायाभिमुख आणि देश प्रगतीला गती देणारे परिपूर्ण शिक्षण देण्याचा ध्यास संस्थेतील प्रत्येक घटकाने घेतला आहे, असे मत स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष, प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी व्यक्त केले.

संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे हे पाटण तालुक्यातील रामापूर (पाटण)चे. लहानपणीच आई–वडिलांचे छत्र हरपले. त्यामुळे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी शिक्षण प्रवास सुरू ठेवला. डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. त्यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही भाग घेतला. काही काळ त्यांनी रयत शिक्षण संस्थेत शिक्षक, मुख्याध्यापक म्हणूनही काम पाहिले.

डॉ. बापूजी साळुंखे यांच्यावर गौतम बुद्ध, संत कबीर, म. फुले, राजर्षी शाहू, डॉ. आंबेडकर, श्री स्वामी विवेकानंद यांच्या विचारांचा प्रभाव होता. स्वामी विवेकानंदांच्या विचारांतून त्यांनी १९५४ मध्ये कराड येथील कृष्णा–कोयनेच्या संगमावर मुरलीधर मंदिरात स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापनेचा निर्णय घेतला. 'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार' या ध्येयाने प्रेरित होत तेथेच त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था स्थापन केली. त्यांनी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या रुपाने लावलेल्या ज्ञानाचे रोपटे आज वटवृक्षात विस्तारीत झाले आहे.



संस्थापक, शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखेंना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासाठी शासनाने दलितमित्र तर शिवाजी विद्यापीठाने डॉक्टरेट देऊन सन्मानित केले. सत्य, चारित्र्य, प्रामाणिकपणा, पिळवणूक प्रवृत्तीला आळा, त्याग व सेवा या पंचतत्त्वावर त्यांचे जीवनविषयक तत्वज्ञान आधारले आहे. बापूजींचे तत्वज्ञानच समाज प्रगती व संस्थेच्या उभारणीला ६४ वर्षे कारणीभूत ठरले आणि संस्थेच्या आत्तापर्यंतच्या कार्यावरून हे स्पष्ट झाले आहे. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे १९८७ मध्ये निधन झाले. त्यांच्याच विचारावर आज संस्था प्रगतीपथाकडे वाटचाल करत आहे.


श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेने सुवर्णमहोत्सव साजरा केला, या संस्थेची अमृतमहोत्सवाकडे वाटचाल सुरू आहे. संस्थेची आज महाराष्ट्र, कर्नाटकात २२ महाविद्यालये, १७१ माध्यमिक शाळा, ६७ उच्च माध्यमिक शाळा, अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांसह अन्य शैक्षणिक केंद्रे आहेत. संस्थेच्या या ४०६ शैक्षणिक केंद्रामधून अविरत ज्ञानदानाचे काम सुरु आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी संस्थेने आधुनिकतेचा स्वीकार केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाखांचे अंतरंग, बाह्यरंग बदलणे, महाविद्यालयीन स्तरावर नवीन व्यवसायाभिमुख, कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू

■ **व्यवसायाभिमुख, कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्याचा मानस : प्राचार्य अभयकुमार साळुंखे**

करण्याचा मानस आहे, अशी माहिती संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी दिली.

महाराष्ट्रातील एक प्रगत, गुणवंत शैक्षणिक प्रयोगशाळा म्हणून श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था उदयास आली आहे. शैक्षणिक क्षेत्रातील नामांकित संस्था म्हणून तिची ओळख आहे. संस्थेने नेहमीच काळानुरूप शैक्षणिक ढाचा, पद्धतीत गुणवत्तापूर्ण बदल केले आहेत. संस्थेच्या विद्यार्थ्यांनी राज्यात, देशात विविध क्षेत्रात लौकिक प्राप्त केले आहे. जागतिकीकरण, खासगीकरण, माहिती तंत्रज्ञान, दळवळणाच्या साधनांची प्रगती याचा प्रभाव शिक्षणावर होत आहे. पारंपारिक शिक्षणाबरोबरच इंजिनिअरिंग, नर्सिंग कॉलेज, हॉटेल मॅनेजमेंट, स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, बी. व्होक, बी.बी.ए, बी. सी.ए, बी.सी.एस, बी.एड, डी.एड असे अभ्यासक्रम सुरू केले आहेत. संस्थेच्या प्रगतीची गती वाढविण्यासाठी प्रयत्नशिल असल्याचे प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांनी सांगितले.

### विद्यार्थ्यांना रोजगार संधीसह स्वयंपूर्ण बनवण्यासाठी संस्था प्रयत्नशील



संस्थेत आधुनिकतेच्या स्पर्धेत टिकण्यासाठी संगणकीय, वैज्ञानिक, संशोधन आणि कौशल्यपूर्ण क्षेत्राला चालना देणारे व व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम सुरू केले आहेत. श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांना रोजगाराची संधी मिळवून देण्यासाठी संस्था सदैव प्रयत्नशील राहिली आहे. भविष्यातही या संस्थेतील विद्यार्थ्यांना रोजगार संधीसह स्वयंपूर्ण बनवण्यासाठी संस्था प्रयत्नशील राहील.

– प्राचार्य अभयकुमार साळुंखे
अध्यक्ष, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूर

30 JUN 2018 पुण्यनगरी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘डीकेटीई’च्या इंजिनिअरिंग पदवी कोर्सेसना एनबीएचे मानांकन

**इचलकरंजी / प्रतिनिधी :**
‘नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रिडिटेशन’(एनबीए) च्या उच्च पदस्थ समितीने डीकेटीईच्या टेक्स्टाईल ॲन्ड इंजिनिअरिंग इन्स्टिट्यूटमध्ये शिकविण्यात येणाऱ्या इंजिनिअरिंग कोर्सेसना मानांकन घोषित केले आहे. एनबीए ही कॉलेजीसना मानांकन देणारी स्वायत्त संस्था आहे. त्यांच्या वतीने शैक्षणिक संस्थांच्या गुणवत्तापूर्ण दर्जा तपासणीसाठी मूल्यांकनाची प्रक्रिया राबवली जाते. एनबीएने दिलेल्या मानांकनाला देशातील शिक्षणप्रणालीमध्ये विशेष महत्त्वाचे स्थान आहे. एनबीए मानांकनामुळे विद्यार्थी, पालक, इंडस्ट्रीज व एकूण समाजालाच उत्कृष्ट शिक्षणांची हमी मिळते.

या एनबीए समितीत भारतातील विविध नामांकित विद्यापीठ व संस्थेतील ११ ते १२ तज्ज्ञांची समिती महाविद्यालयाच्या तपासणीसाठी येत असते. हे मानांकन मिळविण्यासाठी इन्स्टिट्यूटचे शैक्षणिक कार्य, संशोधनात्मक कार्य आणि औद्योगिक क्षेत्रासंबंधी उच्च पातळीवरचे कार्य असणे गरजेचे आहे. या मानांकनासाठी आऊटकम बेसड एज्युकेशन सिस्टीम राबवावी लागते. डीकेटीईमध्ये ही सिस्टीम राबवली गेली, तसेच डीकेटीईमध्ये अद्ययावत प्रयोगशाळा, उत्तम प्लेसमेंटचे रेकॉर्ड एकंदरीत उच्च शैक्षणिक दर्जा या सर्वांमुळे हे यश प्राप्त झाले आहे. एनबीए मानांकनामध्ये टेक्स्टाईल टेक्नॉलॉजी, मॅनमेड टेक्सटाईल टेक्नॉलॉजी, टेक्स्टाईल केमिस्ट्री, टेक्स्टाईल प्लॅण्ट इंजिनिअरिंग, फॅशन टेक्नॉलॉजी व इंजिनिअरिंगचे मेकॅनिकल, इलेक्ट्रॉनिक्स, इटीसी व आयटी एकूण ९ कोर्सेसना मानांकन देण्यात आले.

एनबीएकडून उच्चपदस्थ समितीने नुकतेच संस्थेस भेट दिली व प्रत्येक अभ्यासक्रमांचे काटेकोरपणे



मूल्यांकन केले. या भेटीमध्ये संस्थेतील अभ्यासक्रमातील घटक, अध्ययन, अध्यापन आणि मूल्यमापन, संशोधन, सल्ला आणि विस्तार कार्य, पायाभूत सुविधा आणि शिक्षण, विद्यार्थी सहभाग समर्थन आणि प्रगती, प्रशासन नेतृत्व आणि व्यवस्थापन, नवीन उपक्रम आणि पद्धती या सर्व बाबींची सर्वांगाने सखोल पडताळणी करण्यात आली. तसेच संस्थेचे सर्व सदस्य, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आणि माजी विद्यार्थी यांच्याशी संवाद साधला. संस्थेतील प्राध्यापकांचे अविरत परिश्रम, औद्योगिक क्षेत्राशी संस्थेचा असलेला घनिष्ठ संबंध व करार आणि सीईटीपी, महिला गारमेंट प्रशिक्षण, सेंटर ऑफ एक्सलन्सच्या माध्यमातून होणारे सामाजिक कार्य याचा एनबीए समितीने विशेष गौरवपूर्ण उल्लेख केला. कॉलेजच्या अभ्यासक्रमांना एनबीएचा दर्जा प्राप्त झाल्याचे समजताच प्राध्याप[क] कर्मचारी व विद्यार्थ्यांनी आनंदोत्स[व] साजरा केला.

एनबीए मानांकन हे सर्वांसा[ठी] अभिमानाची व आनंदाची बाब अस[ून] यामुळे संशोधन, गुणवत्तापूर्ण शिक्षण [व] सामाजिक क्षेत्रात अधिक जोमाने कार्य[रत] राहण्यास प्रेरणा मिळाली आहे, अ[शी] भावना माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रका[श] आवाडे यांनी व्यक्त केली.

या सर्व यशामध्ये संस्थेती[ल] प्राध्यापक व कर्मचारी यांच्याबरोबर संस्थेचे अध्यक्ष कल्लाप्पाणा आवा[डे], खजिनदार आर. व्ही. केतकर, मान[द] सचिव डॉ.सपना आवाडे तसेच स[र्व] विश्वस्त आणि संस्थेचे संचालक प्र[ा.] डॉ.पी. व्ही. कडोले, डे. डायरेक्[टर] (प्रशासकीय) प्रा.डॉ. यु. जे. पाटील, डे.डायरेक्टर (शैक्षणिक) प्रा.डॉ. ए[ल.] एस. आडमुठे, सर्व विभागप्रमुख या[ंचा] वाटा आहे.

30 JUN 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# केआयटीत इलेक्ट्रीक इंजिनिअरिंगच्या शाखेला प्रारंभ

## कॉम्प्युटर सायन्सची प्रवेश क्षमता दुप्पट : डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी यांची माहिती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

कोल्हापूर इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी अभियंत्रिकी (स्वायत्त)महाविद्यालय (केआयटी)कोल्हापूरमध्ये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ साठी इलेक्ट्रीकल (विद्युत) अभियांत्रिकी (प्रवेशक्षमता ६०) शाखा सुरु करण्याची अधिकृत मान्यता मिळाली आहे. यावर्षीच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये ऑप्शन फॉर्म भरताना विद्यार्थ्यांना केआयटी इलेक्ट्रीकल इंजिनिअरींगचा पर्याय उपलब्ध आहे. त्याचबरोबर कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इंजिनिअरींगची प्रवेश क्षमता ६० वरुन १२० झाल्याची माहिती पत्रकार परिषदेत संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जिनी यांनी दिली.


जगाची वाढती प्रगती व तंत्रज्ञानात अद्ययावत बदल यामुळे विद्युत अभियंत्यांची मागणी दिवसेंदिवस वाढत आहे. येत्या काळात इंधन साठ्यांच्या कमतरतेमुळे विद्युत वाहनांची चलती व विद्युत उपकरणांची वाढ होणार आहे. त्यामुळे येता काळ म्हणजे विद्युत अभियांत्रिकीच्या वापर व विकास यांच्या नांदीत असणार आहे. १९८० सालापासून अभियांत्रिकीच्या विविध विद्याशाखांचे शिक्षण देणाऱ्या केआयटीकडे पालकांकडून विद्युत अभियांत्रिकीची चौकशी व मागणी होत होती. त्यामुळे केआयटीने पाठपुरावा व अथक परिश्रम घेऊन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद (एआयसीटीई, नवी दिल्ली), महाराष्ट्र शासन (मुंबई) यांची मान्यता व शिवाजी विद्यापीठाची संलग्नता प्राप्त झाली आहे. केआयटीची गुणवत्ता, नॅक व एनबीए मानांकन, सुसज्ज लॅब्स, अनुभवी तज्ज्ञ तसेच पीएच.डी. धारक प्राध्यापक व केआयटीमधील प्राथमिक सोयी-सुविधा विचारात घेऊन ही मान्यता मिळाली आहे. भविष्यात एनबीए मानांकनाअंतर्गत थेट द्वितीय वर्षासाठी इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग (१२०) व मेकॅनिकल इंजिनिअरींग (१८०) यांची क्षमता वाढवून दुसरी तुकडी सुरु करण्याचा केआयटीचा मानस आहे.

केआयटीने सध्या सिव्हील, प्रॉडक्शन, इलेक्ट्रॉनिक्स, कॉम्प्युटर सायन्स या शाखांसाठी एनबीए मानांकन प्राप्त केले आहे. सध्या ऑगस्टमध्ये येणाऱ्या मेकॅनिकल, एनव्हॉर्नमेंटल, बायोटेक इंजिनिअरींग या शाखांसाठी येणाऱ्या एनबीए समितीची जोरदार तयारी सुरु आहे. विद्युत अभियांत्रिकी शाखा मान्यता मिळाल्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांची गुणवत्तापूर्ण शिक्षणाची गरज पूर्ण होणार आहे. या मान्यता प्रक्रियेमध्ये केआयटीचे चेअरमन सचिन मेनन, व्हा. चेअरमन भरत पाटील, सचिव साजिद हुदली, इतर सर्व विश्वस्त व संचालक डॉ. व्ही. व्ही. कार्जिन्नी, रजिस्ट्रार डॉ. एम. एम. मुजुमदार यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी कुलसचिव डॉ. एम. एम. मुजुमदार, डॉ. एम. आर. दीक्षीत, प्रा. प्रमोद पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUN 2018
महाराष्ट्र टाईम्स

# समाजप्रिय शिक्षकाच्या कर्तृत्वाचा ठसा

**कोल्हापुरातील शहाजी छत्रपती महाविद्यालयात गेली तेहतीस वर्षे अध्ययन आणि आध्यापनाचे काम केलेले विद्यार्थी आणि समाजप्रिय शिक्षक प्रा. डॉ. हरिभाऊ श्रीपती वनमोरे शनिवारी निवृत्त होत आहेत. यानिमित्त...**



▸▸ प्रा. डॉ. पांडुरंग पाटील

## निमित्त

प्रा. डॉ. हरिभाऊ वनमोरे यांनी गेली तीन दशके महाविद्यालयाबरोबरच शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना, रोटरी क्लब, जनस्वास्थ्य दक्षता समिती, भारतीय जनकल्याण विभाग, दारुबंदी विभाग, नेहरु युवा केंद्र यांसह अनेक संस्था, संघटनांमध्ये हिरारीने भाग घेऊन आपल्या कामाचा ठसा उमटवला आहे. अत्यंत प्रतिकूल अशा दुष्काळी भागातील शेतमजूर कुटुंबात जन्म घेऊनही त्यांनी कमवा आणि शिका योजनेतून शिक्षण घेतले. स्वतः हजारो विद्यार्थी घडवले. हातकणंगले, शिरोळ परिसरात पाच हजार विद्यार्थी घेऊन शेकडो शौचालये बांधली. २६ जानेवारी २००१च्या गुजरात भूकंपानंतर उद्भवलेल्या परिस्थितीत शंभराहून अधिक स्वयंसेवक घेऊन त्यांनी भूकंपप्रवण क्षेत्रात मदतकार्य केले व गरजूंना मदत केली.

प्रा. वनमोरे सरांचा जन्म म्हैसाळ (ता. मिरज, जि. सांगली) येथे अत्यंत गरीब आणि मागासवर्गीय कुटुंबात झाला. जिल्हा परिषदेच्या शाळेतच त्यांचे सातवीपर्यंतचे शिक्षण झाले. कर्मवीर विद्यालयात माध्यमिक शिक्षण झाले. आपल्या मोलमजूरीत कुटुंबाचा खर्च भागत नाही, म्हणून त्यांच्या वडिलांनी हरिभाऊंना म्हैसाळमधील शिंदे सरकारच्या वाड्यात सालगडी ठेवण्यासाठी नेले. तेथे पडलेला पेपर हरिभाऊ वाचू लागले. ते पाहून शिंदे सरकार घराण्यातील माऊलीने हरिभाऊंना शेतमजूरी न करता कष्ट करून शिकण्याचा सल्ला दिला. त्यासाठी आवश्यक मदत करण्याचे आश्वासन दिले. राजारामबापू पाटील यांच्या कासेगाव एज्युकेशन संस्थेच्या आष्टा येथील आर्टस्, कॉमर्स कॉलेजमध्ये कमवा आणि शिका या योजनेच्या सहाय्याने प्रा. गरड, संस्थेचे सचिव आर. डी. सावंत, प्राचार्य डॉ. पी. आर. शेवाळे, प्रा. ताम्हणकर यांच्या मार्गदर्शनाखाली पदवीपर्यंतचे शिक्षण त्यांनी पूर्ण केले. पुढे शिवाजी विद्यापीठात त्यांनी भूगोल विषयातून पदव्युत्तर पदवी आणि एम. फिल.चे शिक्षण उच्च श्रेणीत घेतले.

त्यानंतर शाहू छत्रपती शिक्षण संस्थेचे सर्वेसर्वा व माजी मंत्री श्रीपतराव बोंद्रे यांनी शहाजी महाविद्यालयात १९८५ साली त्यांची भूगोल विषयात प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. प्राचार्य कटांबळे, प्रा. केंचे, प्रा. घारगे, प्रा. चंद्रकुमार नलगे, प्रा. डॉ. जयसिंगराव पवार, प्रा. ठक्कर, प्रा. आनंद वैराट, प्रा. आर. जी. वराडकर, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अध्यापनाचे उत्तम काम केले. संस्थेचे मानद सचिव विजयसिंह बोंद्रे, चेअरमन मानसिंग बोंद्रे यांच्या प्रोत्साहनामुळे दोन वर्षे प्रभारी प्राचार्य म्हणून काम करण्याची संधी त्यांना मिळाली.

महाविद्यालयाबरोबरच शिवाजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागप्रमुख म्हणूनही त्यांनी उत्कृष्टपणे काम केले. राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांना श्रमाचे महत्त्व पटवून दिले. हातकणंगलेसारख्या तालुक्यात पाच हजार स्वयंसेवकांना घेऊन शेकडो शौचालये उभारली. शासनाच्या 'व्यसनमुक्त पहाट' अभियानात सहभागी होऊन प्राचार्य डॉ. मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील पहिले व्यसनमुक्त महाविद्यालय म्हणून शहाजी महाविद्यालयास पुरस्कार मिळवला. गुजरातमध्ये २६ जानेवारी २०११ साली झालेल्या विनाशकारी भूकंपानंतर तेथे नेहरू युवा केंद्र आणि भारत सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाद्वारे १७५ स्वयंसेवक घेऊन एक महिना मदतकार्य केले. माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे, प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे, माजी बीसीयूडी संचालक डॉ. राजगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी एनएसएसचे विविध उपक्रम राबवले. शंभर खेड्यांत त्यांनी हागणदारीमुक्त गाव अभियान राबवले. रोटरी क्लब, जिल्हा विधी व सेवा प्राधिकरणाच्या सहकार्याने त्यांनी अनेकांना मार्गदर्शन व सहकार्य केले. त्यामुळे ते विद्यार्थी आणि समाजप्रिय शिक्षक बनले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 JUN 2018
Times of India

# Charge minor fee for lead college activities: SUK


TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has asked its affiliated colleges to charge a minor fee ranging from Rs 25 to Rs 100 from students enrolling for the academic year 2018-19.

In a circular, dated June 11, the varsity has asked the respective colleges to collect Rs 25 from arts, science and commerce students, Rs 50 from law, physical education and management students, and Rs 100 from engineering, pharmacy and technology students.

According to the circular, the colleges have to deposit the total amount collected through this initiative with the university. The university will later deposit 90% of the total amount to the Lead College to initiate better activities during the academic year.

Elaborating more on the lead college, an SUK official said, "A Lead College is expected to lead the entire process of total quality management of the cluster. The primary function of a Lead College is to collect and update all sorts of information regarding higher education. The changes in the field of science and technology, research and recent policies are the major field that requires constant vigil."



**A Lead College is expected to lead the entire process of total quality management of the cluster. Its primary function is to collect and update all sorts of information regarding higher education**

He added, "The amount collected is given back to the colleges to organise various activities, be it a personality development lecture, awareness campaign on the sexual harassment or expert lecture on the competitive examinations."

The official further added that information regarding various grants offered by the University Grants Commission (UGC) and such other funding agencies, activities of National Assessment and Accreditation Council (NAAC) and re-accreditation process, e-content and e-learning should also be imparted by the lead college in its cluster.

According to the official, strengthening of placement cell with an officer remains an important agenda for Lead College. The colleges in cluster can obtain proper and relevant guidance in this regard from its lead college.

"The SUK has around 20 Lead Colleges across the Satara, Sangli and Kolhapur districts," the official said.